जागतिक महिला दिन
शासकीय कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांच्या मेळाव्यास उपस्थित राहण्यास परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः संकिर्ण - ३६१९ / प्र. क्र. १४ /१८ (र.व का.)

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०१ मार्च, २०१९

परिपत्रक :

जागतिक महिला दिनानिमित्त बृहन्मुंबई राज्य सरकारी कर्मचारी संघटना, मुंबई यांच्यातर्फे बृहन्मुंबईतील शासकीय महिला कर्मचाऱ्यांसाठी शुक्रवार दिनांक ०८ मार्च, २०१९ रोजी शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, सभागृह, सेंट जॉर्ज रुग्णालय, सी. एस. टी. जवळ, मुंबई - ४०० ००१ येथे दुपारी २.०० वाजता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

२. तरी, बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांना वरील कार्यक्रमासाठी उपस्थित राहता यावे यासाठी शुक्रवार, दिनांक ०८ मार्च, २०१९ रोजी दुपारी १.३० वाजता कार्यालय सोडण्याची अनुमती देण्यात येत आहे. सर्व मंत्रालयीन विभागांनी बृहन्मुंबईतील आपल्या अधिपत्याखालील कार्यालयांना त्याप्रमाणे कळविण्याची व्यवस्था करावी. तथापि, सदर सवलतीमुळे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत देण्यात येणारी ४ तासांची सूट पुढील आठवडयात भरुन काढावी.

४. हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक **२०१९०३०११८००५१७२०७** असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Samridhi V. Angolkar

Digitally signed by Samridhi V. Angolkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=75fb066f4ac20e1679d8a5748d7e2501eac9d8a887 27d55e8fe136e3ff41b40d, cn=Samridhi V. Angolkar
Date: 2019.03.01 18:02:34 +05'30'

(समृद्धी अनगोळकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिवमुंबई ,मंत्रालय ,
२. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
३. निवड नस्ती.(कार्यासन-१८)